महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४४७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:- Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.४८१/एसएम-२ दिनांक:- ९ ऑक्टोबर, २०२३

## मान्यता पत्र

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
श्री नारायणी एज्युकेशन सोसायटी,
पुणे.

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

श्री नारायणी एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित ऐंजल्स ग्रेस वर्ल्ड इंग्लिश मिडीअम स्कुल, सर्व्हे क्र. ४६/२, मौजे आंबेगाव खुर्द, ता. हवेली, जि. पुणे

संदर्भ- इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.४८१/एसएम-२, दि. ०९.११.२०२१.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत श्री नारायणी एज्युकेशन सोसायटी, पुणे या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून ऐंजल्स ग्रेस वर्ल्ड इंग्लिश मिडीअम स्कुल, सर्व्हे क्र. ४६/२, मौजे आंबेगाव खुर्द, ता. हवेली, जि. पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ.१२ वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ, सर्व शाखा) ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून श्री नारायणी एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित ऐंजल्स ग्रेस वर्ल्ड इंग्लिश मिडीअम स्कुल, सर्व्हे क्र. ४६/२, मौजे आंबेगाव खुर्द, ता. हवेली, जि. पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ.१२ वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ, सर्व शाखा) स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटीं व शर्तींसह इरादा पत्र दिले होते. आता शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सदर नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तींस अधीन राहून देण्यात येत आहे:-

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

Principal
Angel Grace World School
Pune- 411046

Principal
Angel Grace World School
Pune- 411046